# कौटुंबिक न्यायालय, पुणे

## कार्यालयीन आदेश क्र. आस्था/३४/२०२१

वाचा : १) ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाने निर्देशित केलली दिनांक ०३/०६/२०२०, दिनांक २९/१०/२०२० व दिनांक २७/११/२०२० रोजीची कार्य प्रणाली

२) ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक १६/०६/२०२०, १५/०९/२०२०

३) ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाचे पत्र क्र. इंस्पे-१/९/२०२१, दिनांक २९/०१/२०२१

## कार्यालयीन आदेश

प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, पुणे हे दिनांक ०१/०२/२०२१ रोजीपासून ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाच्या उपरोक्त सदंर्भांकित पत्रानुसार पुढील आदेश होईपर्यंत या कार्यालयाच्या आस्थापनेवरील न्यायालयीन व कार्यालयीन कामकाजाबाबत खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहेत,

१. या न्यायालयाचे व कार्यालयाचे कामकाज दिनांक ०१/०२/२०२१ पासून खालीलप्रमाणे आहे

| | | |
|---|---|---|
| न्यायालयीन कामाकाजाची वेळ | : | सकाळी ११.०० ते दुपारी २.००<br>दुपारी २.४५ ते दुपारी ५.४५ |
| कार्यालयीन कामाकाजाची वेळ | : | सकाळी १०.३० ते संध्या. ६.०० |
| नाझर विभाग, दाखल विभाग व नक्कल विभागाच्या कामकाजाची वेळ | : | सकाळी १०.३० ते दुपारी २.००<br>दुपारी २.३० ते संध्या. ५.१५ |
| मधल्या सुट्टीची वेळ | : | दुपारी २.०० ते दुपारी २.३० |

२. याद्वारे या कार्यालयाच्या आस्थापनेवर सध्या कार्यरत असलेल्या सर्व न्यायिक अधिकारी, विवाह समुपदेशक व कर्मचारी यांना सुचित करण्यात येते की, कोविड-१९ या संसर्गजन्य आजार पसरण्यापूर्वी जसे न्यायालयाचे काम चालत होते तसेच दिनांक ०१/०२/२०२१ पासून न्यायालयीन कामकाज चालू राहील.

३. कोविड-१९ या महामारीसंबंधी गृह मंत्रालय, भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार मार्गदर्शक तत्वांचे व ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाने उपरोक्त सदंर्भांकित परिपत्रकांतील मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

४. या कार्यालयाच्या आस्थापनेवरील १००% कर्मचा-यांनी रोज कार्यालयात हजर रहाणे अनिवार्य आहे.

५. वर्ग-४ मधील कर्मचा-यांनी सकाळी ९.३० ते संध्या ६.०० वा. पर्यंत कार्यालयात हजर राहून त्यांना नेमून दिलेली कार्यालयीन कामे पार पाडावीत.

संबंधितांना त्याप्रमाणे कळविण्यात यावे.

सु.काफरे
३०/१/२०२१

(सुभाष रं. काफरे)
प्रमुख न्यायाधीश,
कौटुंबिक न्यायालय, पुणे.

पुणे
दिनांक : ३०/०१/२०२१